महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००)/०२/२०२३, मुंबई, दिनांक १६/०८/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन पत्र, क्र.संकीर्ण-०८२४/प्र.क्र.१८८/आस्था-१, दिनांक १६ ऑगस्ट, २०२४.

**विषय** :- राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२४-२५ या वर्षाकरीता दि. २० ऑगस्ट पासून सर्व स्तरावर राबविण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन पत्र, क्र. संकीर्ण-०८२४/प्र.क्र.१८८/आस्था-१, दिनांक १६ ऑगस्ट, २०२४. ची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. तरी, शासन पत्रातील दिलेल्या निर्देशानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे /दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/
महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई. नक्षल विरोधी अभियान,नागपूर.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**महाराष्ट्र शासन**

गृह विभाग,

नवीन प्रशासन भवन, १२ वा मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क. २२०२८१६६ Email ID: home_hdo1@maharashtra.gov.in

क्रमांक : संकीर्ण-०८२४/प्र.क्र.१८८/आस्था-१ दिनांक - १६ ऑगस्ट, २०२४.

प्रति,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई.
३. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अपर पोलिस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. महासमादेशक, होमगार्डस, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, मुंबई.
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.
१०. सचिव, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, ९ हजारीमल सोमानी मार्ग, मुंबई-१.
११. अवर सचिव (आस्थापना-२), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- राजीव गांधवी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२४-२५ या वर्षाकरीता दि. २० ऑगस्ट पासून सर्व स्तरावर राबविण्याबाबत.

महोदया / महोदय,

उपरोक्त विषयावरील सामान्य प्रशासन विभागाचे क्र. रागांअ-११२४/प्र.क्र.२८/र. व का.२, दिनांक २९ जुलै, २०२४ रोजीच्या पत्राची प्रत नियमोचित कार्यवाही करीता यासोबत पाठवीत आहे. तसेच याबाबत आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांना देखील अवगत करण्यात यावे, ही विनंती.

आपला,

( मुं. उ. भरोसे )

कक्ष अधिकारी, गृह विभाग

सहपत्र - वरील प्रमाणे.

Letters-2024\99

क्र. 1038 / दि. 7-8-24
प्र.स.(अवसु)/गृह विभाग

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), कक्ष क्र. ७१३, मुंबई- ४०००३२.

दूरध्वनी क्र. (०२२) २२७९ ४२२८ ई मेल : desk18a.gad@maharashtra.gov.in

---

क्रमांक :- रागांअ ११२४/प्र.क्र. २८ /र.व का.२ दिनांक :- २९/०७/२०२४

प्रति,

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
२. विभागीय आयुक्त, सर्व महसूली विभाग, महाराष्ट्र.
३. आयुक्त , सर्व महानगरपालिका, महाराष्ट्र
४. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हाधिकारी कार्यालय, महाराष्ट्र
५. सर्व जिल्हा पालक सचिव.

**विषय:- "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा" सन २०२४-२५ या वर्षाकरिता दि.२० ऑगस्ट पासून राज्यात सर्व स्तरावर राबविण्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत शासन निर्णय क्रमांक : प्रसुधा १११९/प्र.क्र.३/१८-अ,दिनांक ३ फेब्रुवारी २०२१ कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२. "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा" सर्व स्तरांवर राबविण्याच्या या विभागाच्या दिनांक ३/२/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ येथे १ ते ७ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे. सन २०२४-२५ या वर्षाकरिता उक्त अभियान व स्पर्धा राबविणे आवश्यक आहे.

१) अभियान कृती कालावधी प्रतिवर्षी दिनांक २० ऑगस्ट ते २ ऑक्टोबर असा दीड महिन्याचा असेल.

२) स्पर्धेसाठी विचारात घ्यावयाचा कालावधी, २० ऑगस्ट पासून एक वर्षाचा असेल. प्रशासकीय सुधारणेविषयी प्रस्ताव व कल्पना यासाठी मात्र कालावधीची अट नसेल.

३) उपविभागाचे मुख्यालय असलेल्या तालुक्याच्या ठिकाणी उपविभागीय अधिकारी आणि इतर तालुक्यात तहसीलदार हे तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक, तलाठी व गटविकास अधिकारी यांना निमंत्रित करतील व तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांच्या सभेमध्ये प्रगती अभियानाची संकल्पना मांडतील. याच सभेमध्ये सहभागासाठी मा. विधानसभा सदस्य, मा. विधानपरिषद सदस्य, जिल्हा परिषद सदस्य व सभापती, पंचायत समिती यांना विशेष विनंती करतील.

४) जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी, मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलावून जिल्हयातील सर्व मा. संसद सदस्य, मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य, अध्यक्ष, जिल्हा परिषद यांना निमंत्रित करतील. याच बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद तसेच इतर

F:\Letter जुलै २०२४.docx

जिल्हा स्तरावरील सर्व विभागप्रमुख यांना सुद्धा वरील बैठकीत निमंत्रित करतील व सदर योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबाबत आवाहन करतील.

५) महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्त, नागरी संस्थांचे सर्व विभाग प्रमुख यांची बैठक घेऊन योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबाबत विनंती करतील. मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करून मा. संसद सदस्य, मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य, नगरपालिकेचे व महानगरपालिकेचे पदाधिकारी यांनाही बैठकीत आमंत्रित करतील.

६) विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त, सर्व विभाग प्रमुख यांची बैठक घेऊन योजनेमध्ये सर्वांच्या सहभागाबद्दल आवाहन करतील.

३. उपरोक्त अनु.क्र.१ ते ६ मधील तरतुदींप्रमाणे "राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा" सन २०२४-२५ या वर्षाकरिता सर्व स्तरावर राबविण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या सचिवांनी, ते ज्या जिल्हयाचे पालक सचिव आहेत त्या जिल्हयात बैठका आयोजित करण्याबाबत त्याचप्रमाणे विभागीय, जिल्हा, महानगरपालिका व तालुका स्तरावर कार्यवाही करण्याबाबत आपल्या विभागातील तसेच आपल्या अधीनस्त कार्यालयांतील सर्व संबंधितांना कृपया सूचना दयाव्यात.

आपला,

(दीपक मोरे)
शासनाचे उपसचिव

प्रत- निवडनस्ती, कार्यासन र.व का २.

F:\Letter जूलै २०२४.docx